2 4 MAY 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आजपासून अक्षर संमेलन

कोल्हापूर : माझी शाळा माझा फळा समूह व शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ ते २६ मे या कालावधीत तिसरे राज्यस्तरीय अक्षर संमेलन आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवारी सकाळी ११ वाजता कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते याचे उद्घाटन होईल. राज्य शासनाच्या गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट संमेलनाध्यक्ष आहेत. दुपारी तीन वाजता कलेतून व्यवसायनिर्मिती विषयावर परिसंवाद होईल. सायंकाळी ५ वाजता गालिचा व अक्षर रांगोळी उपक्रम होईल. रात्री ९ वाजता संगीत मैफल होईल. संमेलनात महाराष्ट्रासह अन्य राज्यांतील कलाकार व शिक्षक सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 MAY 2024

सकाळ




**कोल्हापूर :** सॉफ्टबॉल स्पर्धेत रौप्यपदक मिळाल्याबद्दल राधिकाचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत मान्यवर.

# सॉफ्टबॉल स्पर्धेतील यशाबद्दल राधिका कळंत्रे हिचा सत्कार

**सकाळ वृत्तसेवा**

बोरपाडळे, ता. २३ : पंजाब येथे झालेल्या ऑल इंडिया युनिव्हर्सिटी सॉफ्टबॉल स्पर्धेत रौप्यपदक पटकावल्याबद्दल अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते राधिका शिवलिंग कळंत्रे हिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तसेच डॉ. पी. एस. पाटील, विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, क्रीडा संचालक व शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. बनसोडे आदी उपस्थित होते. राधिका सध्या वारणानगरच्या यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात एम. एस्सी.चे शिक्षण घेत आहे. तिने आतापर्यंत अनेक राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण तसेच रौप्यपदके पटकावली आहेत. तिला वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभल्याचे ज्योतिर्लिंग पब्लिक स्कूलचे संस्थापक-अध्यक्ष शिवलिंग कळंत्रे यांनी सांगितले.